Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**मार्च/एप्रिल/मे - २०२० उन्हाळी सत्रातील परीक्षांबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाबाबत**

**संदर्भ- १) मा. संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र। युएनआय/२०२०/बैठक/विशी-१/४१३१/ए,दिनांक ८ मे ,२०२०**
**२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र .शिवाजी वि/ परीक्षा / ३३ / २०२० दिनांक १५ मे ,२०२०**

कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तदअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरिता राज्य शासनाने समिती गठीत केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारसी शासनाने स्वीकृत केल्याचे व त्या अनुषंगाने विद्यापीठानी आवश्यक कार्यवाही करून अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये सूचित केलेले आहे. ( सुलभ संदर्भासाठी सोबत प्रत जोडली आहे )

त्यास अनुसरून प्रस्तुत शिफारसी विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणासमोर सादर करण्यात येत असल्यामुळे दरम्यानच्या काळात महाविद्यालये, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम राहू नये व त्यांना सदर बाबीची प्राथमिक माहिती अवगत व्हावी या हेतूने या कार्यालयामार्फत संदर्भ क्रं. २ येथील परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. (सुलभ संदर्भासाठी सोबत प्रत जोडली आहे )

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शक सूचना आणि मा. संचालक , उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्रं. १ येथील पत्रान्वये कळविलेल्या मार्गदर्शक सूचना अवलोकनी घेवून शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या उन्हाळी सत्राच्या परीक्षा आणि निकाल घोषित करण्याबाबत परीक्षा विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

| अ. क्रं. | परीक्षार्थ्यांची वस्तुस्थिती | विद्यापीठामार्फत करण्यात येणारी कार्यवाही |
|---|---|---|
| **अ) अंतिम वर्षाचे नियमित आणि रीपीटर परीक्षार्थी**<br>**(यामध्ये २, ३, ४ व ५ वर्षीय सर्व अभ्यासक्रमांचा समावेश आहे )** | | |
| अ-१ | अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरलेले **(ज्यांचे पूर्वीच्या सत्रातील कोणतेही विषय अनुत्तिर्ण/ गैरहजर नाहीत असे)** परीक्षार्थी | अशा सर्व परीक्षार्थ्यांसाठी परीक्षेचे (लेखी,प्रात्यक्षिक, मौखिक इ.) आयोजन दि. १ जुलै ते ३१ जुलै २०२० या कालावधीत करण्यात येईल. |
| अ-२ | अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरलेले **(ज्यांचे पूर्वीच्या सत्रातील कोणतेही विषय अनुत्तिर्ण/ गैरहजर आहेत असे म्हणजेच अनुशेष असणारे )** परीक्षार्थी | अशा सर्व परीक्षार्थ्यांसाठी परीक्षेचे (लेखी,प्रात्यक्षिक, मौखिक इ.) आयोजन दि. १ जुलै ते ३१ जुलै २०२० या कालावधीत करण्यात येईल. |
| अ-३ | ज्या परीक्षार्थ्याचे अंतर्गत मूल्यमापन अपूर्ण आहे | सर्व परीक्षार्थ्याचे अंतर्गत चाचणी, प्रकल्प कर्म, सत्र कर्म , तोंडी परीक्षा इ. जे लागू असेल ते अंतर्गत मूल्यमापन विद्यापीठ अधिविभाग/ महाविद्यालयामार्फत पूर्ण करून घेण्यात येईल . |
| **ब) अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षाचे नियमित** परीक्षार्थी<br>**( यामध्ये २, ३, ४ व ५ वर्षीय सर्व अभ्यासक्रमांचा समावेश आहे )** | | |
| ब-१ | ज्यांनी चालू सत्राच्या (उदा. सत्र २/४/६/८) परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरलेला आहे | अशा सर्व परीक्षार्थ्याचे गुणांकन खालील सूत्रांनुसार केले जाईल -<br>एकूण गुण = चालू सत्राचे अंतर्गत मूल्यमापन गुण ५० % + लगतच्या सत्राचे गुण ५० %<br>याबाबत सविस्तर तपशील संदर्भ क्रं. २ येथील परिपत्रकातील मुद्दा क्रं. ७ मध्ये नमूद केल्यानुसार असेल. |
| | | **वरील सुत्रानुसार निकाल घोषित करताना गुणपत्रिकेवर चालू सत्रामधील अंतर्गत गुण आहेत तसेच दर्शवून सत्राच्या सैद्धान्तिक/ लेखी परीक्षेचे गुण हे त्या अनुषंगाने दर्शवण्यात येतील.**<br><br>उदा. ८० :२० पॅटर्नमधील दुसऱ्या सत्राच्या परीक्षार्थीचे पहिल्या सत्राचे सरासरी गुण ७० (१०० पैकी ) असल्यास व एका विषयाचे अंतर्गत गुण १८ (२० पैकी ) असतील तर संयुक्त सूत्रानुसार ३५ + ४५ असे एकूण ८० गुण देण्यात येतील |

| | | |
|---|---|---|
| | | **असे देण्यात येणार गुण सदरचे** ८० (१०० पैकी ) **गुण गुणपत्रिकेवर दर्शवताना खालील प्रमाणे नमूद करण्यात येतील =**<br>**त्या पेपरचे अंतर्गत गुण १८ (२० पैकी)**<br>**त्या पेपरचे लेखी परीक्षा गुण ६२ (८० पैकी)** |
| ब-२ | चालू सत्राच्या परीक्षेव्यतिरिक्त पूर्वीच्या सत्रातील अनुत्तिर्ण / गैरहजर विषयासाठी परीक्षा अर्ज भरलेले परीक्षार्थी | अशा सर्व परीक्षार्थ्यांची परीक्षा जुलैमध्ये आयोजित केली जाणार नसून ती पुढील चार महिन्यामध्ये आयोजित केली जाईल. परिस्थितीनुसार यामध्ये बदल झालेस तसे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल. |
| ब-३ | ज्या विद्यार्थ्यांना एटीकेटी न मिळालेने Year Down झालेले आहेत व ज्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरलेला आहे | अशा सर्व परीक्षार्थ्यांच्या परीक्षा उपरोक्त ब-२ नुसार घेण्यात येतील |

**क) अन्य निर्णय :**

१. फक्त विद्यमान परीक्षेसाठी - अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षांचे सर्व अभ्यासक्रमांचे सर्व परीक्षार्थी कॅरी फॉरवर्ड पद्धतींनुसार पुढील वर्षामध्ये प्रवेशास पात्र असतील.

२. वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युत्तर पदविका / पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थ्यासाठी अंतिम परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून त्यांनी परीक्षा देणे आवश्यक आहे.

३. ज्या परीक्षार्थींची अंतर्गत परीक्षा पूर्ण झाली नसेल अशा परीक्षार्थींची अंतर्गत परीक्षा पूर्ण करून घेण्यात येणार असून सदर परीक्षेसाठी गैरहजर परीक्षार्थींना अंतर्गत परीक्षेमध्ये गुणांकन देण्यात येणार नाही.

अंतिम वर्षाव्यतिरिक्त इतर वर्षातील परीक्षार्थ्यांच्या बाबतीत अंतर्गत गुणांचे बाबतीत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे -

(i) ज्या अभ्यासक्रमास अंतर्गत गुण लागू नाही अशा अभ्यासक्रमासाठी लगतच्या पूर्वीच्या सत्राचे गुण १०० % चालू सत्राच्या गुणदानासाठी विचारात घेण्यात येणार आहेत.

(ii) जे परीक्षार्थी लगतच्या पूर्वीच्या सत्रामध्ये एक किवा अनेक विषयात अनुत्तीर्ण झालेले असतील अशा परीक्षार्थींचे परीक्षेतील सर्व विषयांचे एकूण गुण घेवून सरासरी काढण्यात येईल आणि असे सरासरी गुण हे चालू सत्राच्या अंतर्गत गुणामध्ये प्रत्येक विषयासाठी ग्राह्य धरण्यात येतील .

४. “ **पर्यावरण अभ्यास** ” या विषयाची लेखी परीक्षा होणार नाही. या विषयाचे गुणदान प्रकल्प / अंतर्गत गुणावर करून श्रेणी / गुणदान करण्यात येईल.

५. Skill Development Course, व Democracy, Election and Good Governance तसेच Communication Skill या विषयाची परीक्षा झाली असेल तर त्याचे गुण विचारात घेवून निकाल घोषित करण्यात येईल. ज्यांची या विषयाची परीक्षा झालेली नाही त्यांची परीक्षा पुढील शैक्षणिक सत्रात/वर्षात घेवून त्याचा निकाल त्यावेळी घोषित करण्यात येईल .

६. चालू सत्राचा निकाल घोषित झालेनंतर ज्या परीक्षार्थींना गुणांकनात सुधारणा करावयाची असेल तर त्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी येत्या शैक्षणिक वर्षात उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकरणी दोन्ही परिक्षेतील जे जास्तीचे गुण असतील ते परीक्षार्थीला देण्यात येतील.

७. परीक्षेवेळी सर्व संबधित घटकांनी या परिपत्रकासोबत जोडलेल्या **Sanitization Protocol** चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

८. ज्या विद्यार्थ्यांचे टाळेबंदी अथवा काही कारणास्तव परीक्षा अर्ज अद्याप भरावयाचे राहिलेत अशा परीक्षार्थींना परीक्षा अर्ज भरण्याची संधी अधिकारमंडळाच्या निर्णयानुसार देण्यात येणार असून याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

९. तथापि उपरोक्त घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग/ महाराष्ट्र शासनाकडून यापुढे वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल व सदरची बाब विद्यापीठ संकेतस्थळावरून सर्व सबंधित घटकांना अवगत करण्यात येईल.

**प्र. संचालक**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

सोबत : वरीलप्रमाणे

**जा. क्र. /शिवाजी वि/परीक्षा /३५ / २०२०**

**दिनांक - २९ मे २०२०**